MHNG030293102025

<u>**नियमित फौजदारी खटला/४३०३/२०२५**</u>

<u>**महाराष्ट्र शासन वि.. अभय नथ्थुजी ढोरे**</u>

<u>**मधील नि.क्र.३ खालील आदेश**</u>

अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज कलम ५०३ बी.एन.एस.एस. प्रमाणे जप्त मुद्येमाल म्हणजेच रोख रक्कम ८०,०००/– पुर्ववत ताब्यात मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

१] अर्जदार यांचे थोडक्यात कथन असे आहे की, आरोपींनी अर्जदाराची फसवणूक करून प्राप्त केलेले अर्जदाराचे मालकीचे नगदी रू.८०,०००/– पो.स्टे गणेशपेठ यांनी गु.र.नं.४१/२०२५ च्या कलम ३१८(४), ३(५) भारतीय न्याय संहिता मधील तपासादरम्यान आरोपीच्या ताब्यातून जप्त केले आहे. अर्जदाराचे थोडक्यात कथन असे की, सदरची रोख चा अर्जदार हा कायदेशीर मालक असुन सदरची रक्कम अर्जदाराला मिळावी याकरिता अर्जदाराने मिळणेबाबत विनंती केली आहे.

२] सरकारतर्फे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी प्रस्तुत अर्जास म्हणणे सादर केले असुन त्यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये असे नमुद केले आहे की, कागदपत्रांची पडताळणी करून योग्य तो आदेश पारित करण्यात यावा. तपासी अधिका–याने सादर केलेल्या निशाणी क्र.१३ वरील म्हणण्यानुसार त्यांची रोख रक्कम अर्जदाराला देण्याकामी कोणतीही हरकत नाही.

३] दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला.

४] अर्जदाराने त्यांचे मागणीचे पृष्ठयर्थ शपथ पत्र दाखल केले आहे. त्यांनी त्यांचे शपथपत्रात अर्जातील कथनांचा पुर्नउच्चार केला आहे. तसेच तपासी अधिकारी यांनी त्यांचे लेखी म्हणणे निशाणी क्र.१३ वर दाखल केले असून त्यामध्ये आरोपीकडून जप्त रोख ८०,०००/– रूपये फिर्यादी यांना देण्यास त्यांची काहीही हरकत नसल्याचे नमूद केले आहे त्यावरुन अर्जदार हा जप्त रोख रकमेचा मालक

असल्याचे शाबीत होते.

५] मी **<u>मा. सर्वोच्च न्यायालय यांनी सुंदरभाई अंबालाल देसाई विरुध्द गुजरात शासन ए.आय.आर.२००३ सर्वोच्च न्यायालय पान क्र.६३८</u>** मध्ये दिलेल्या न्यायनिवाडयाचे अवलोकन केले. सदर निवाडयामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने असे स्पष्ट केले आहे की, जप्त मुद्येमाल पोलीस ठाण्यात जास्त काळ न ठेवता त्या संदर्भात लवकरात लवकर योग्य ते आदेश करावेत.

६] जप्त मुद्येमालाची मालकी दाखवणारा दुसरा इसम या प्रकरणात हजर झालेला नाही. त्यामुळे सदरचा जप्त मुद्येमाल पोलीस स्टेशनला जप्त ठेवुन कोणताही उपयोग होणार नाही. वरील सर्व बाबींचा विचार करता सदर रोख रक्कम अटी व शर्तीवर अर्जदाराच्या अंतरिम ताब्यात देणे उचित होईल. करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

| | | |
|---|---|---|
| **१.** | | अर्ज मंजूर करण्यात येतो. |
| **२.** | | अर्जदार याने सदर जप्त मुद्येमाल न्यायालय किंवा तपासी अंमलदार ज्या ज्या वेळी आदेशीत करतील त्या त्या वेळी हजर ठेवावा. |
| **३.** | | तपासी अंमलदार पो.स्टे. गणेशपेठ, नागपूर यांना आदेशीत करण्यात येते की त्यांनी गु.र.नं.४१/२०२५ मध्ये जप्त मुद्येमाल म्हणजेच रोख रक्कम रू.८०,०००/- चा ताबा अर्जदार नामे दिपक मोरेश्वरजी कोल्हे यास रक्कम रुपये ८०,०००/- (रुपये ऐंशी हजार) च्या हमी पत्रावर (Indemnity Bond) खालील अटींवर देण्यात यावे. |
| | **अ.** | तपासी अंमलदार यांनी सदर जप्त मुद्येमालचे फोटो काढावेत. |
| | **ब.** | तपासी अंमलदार यांनी सदर जप्त मुद्येमालाच्या सद्य परिस्थिती बाबत सविस्तर पंचनामा करावा. |
| | **क.** | हमीपत्र, फोटो व त्याचे निगेटीव्ह तसेच पंचनामा न्यायालयात त्वरीत दाखल करावा. |

| | | |
|---|---|---|
| **४.** | | तपासी अंमलदार यांना आदेशीत करण्यात येते की, सदरची सर्व कागदपत्रे तात्काळ न्यायालयात सादर करावीत. |
| | | (खुल्या न्यायालयात घोषीत केला) |

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by KAUSTUBH NAGESH MARATHE
Date: 2026.05.04 16:55:34 +0530

**नागपूर** **(कौस्तुभ नागेश मराठे)**

**दि. ०४/०५/२०२६** **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, नागपूर.**

**(कोर्ट क्र.१)**

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P. D. F. file are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Dictated on | :- | 04.05.2026 |
| Transcribed on | :- | 04.05.2026 |
| Checked & Signed on | :- | 04.05.2026 |

Sd/-
(P. M. Chaware)
Stenographer G-3, Nagpur